# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/05/2023 (गुरूवार) दुपार

---

## कोळसा चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०३ किमी अंतरावर धन्यवाद गेट जवळ कांद्री कन्हान येथे दिनांक १०/०५/२०२३ चे ०३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— फराज इफतखार अहमद, वय २२ वर्ष, रा. जे. एन. रोड वारीसपुरा कामठी हा डब्लु. सी. एल. येथे कामठी ओ. सी. एम येथे सिक्युरीटी गार्डचे काम करतो सोबत निखील वैदय, सचिन चचाने, अविनाश पिंगळे व ड्रायव्हर पियुष राहाटे यांची २४/०० वा. ते ०८/०० वा. डयुटी असतांना पेट्रोलींग करीत असता यातील घटना वेळी व ठिकाणी धन्यवाद गेट येथे फिर्यादीला कोळसा भरून ओमनी कार क्रमांक MH- ३६/४०४४ ही गाडी येतांना दिसली तिचा पाठलाग करून ती गाडी हायवे रोड वरती दिपांशु हार्डवेअर कन्हान येथे मिळून आली. त्यातील ड्रायव्हरला नाव विचारले असता त्याने आपले नाव **अजय दर्या सरोदे, वय २८ वर्ष रा. शिवनगर कांद्री कन्हान** असे सांगीतले त्यामध्ये असलेल्या कोळशाबाबत विचारणा केली असता त्यांनी गोंडेगाव माईन्स मधुन आणल्याचे सांगीतले त्या गाडी मध्ये १३०० किलो कोळसा किंमती अंदाजे १०,४००/— रू. व गाडी किंमती अंदाजे ३०,०००/—रू. असा एकुण ४०,४००/—रूपयाचा मुद्देमाल चोरी करतांनी मिळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास एएसआय सुर्यभान जळते ब. नं १३५ मो. क्र. ९६७३८३७००७ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १२ किमी अंतरावर वडोदा बाजार चौक येथे दिनांक १०/०५/२०२३ चे १९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— किरण युवराज भोयर, वय ३१ वर्ष, रा. सेलु ता. कामठी जि. नागपुर हा मौदा वडोदा येथे आठवडी बाजाराकरीता गेला असता त्याचे खिशात असलेला मोबाईल कोणीतरी चोरुन नेल्याने त्याने आठवडी बाजारात शोध घेतला असता बाजारात लोकांची गर्दी दिसली तेव्हा जवळ जावुन पाहीले असता लोकांनी **आरोपी नामे— आकाश मदन चौहान, वय १९ वर्ष, रा. मांडवी ता. कळमेश्वर जि. नागपुर** याला पकडुन ठेवले होते व त्याचे कडुन दोन मोबाईल एकुण किंमती अंदाजे १८०००/— मिळुन आले व त्याचे सोबत दोन इसम असुन ते पळुन गेले फिर्यादीचा मोबाईल यांनीच चोरी केला असावा अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनी सोनेकर मो. क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर